# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 18/12/2023 (सोमवार) सायंकाळ

---

## जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत नितीन जैस्वाल यांच्या देशी दारू दुकान समोर तारबाजार काटोल येथे दिनांक १७/१२/२०२३ चे ११.३० वा. ते ११.४५ वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– मोहन शंकरराव वाईन्देश्वर रा. फैलपुरा गौरक्षण च्या मागे काटोल हे दिनांक १७/१२/२०२३ रोजी १०/०० वा. दरम्यान काटोल येथे आपले घरी आले असता घराशेजारीच्या मयतीत फिर्यादी हा हजर असता तेथे फिर्यादीला १२/०० वा. दरम्यान मित्र नामे–प्रमोद चापले रा. काटोल यांचा फोन आला व त्यांनी सांगीतले कि तुझे वडिल नितीन जैस्वाल याच्या देशी दुकानाच्या गेट जवळ पडलेले आहे. अशा माहिती वरून फिर्यादी हा लगेच तेथे गेला व पाहिले असता फिर्यादीचे वडिल हे रक्ताने भरून पडलेले दिसले फिर्यादीने कार मध्ये बसवुन चिंचे हॉस्पीटल मध्ये नेले असता डॉक्टरांनी तपासुन मरण पावल्याचे सांगितले नंतर फिर्यादीने सरकारी दवाखान्यात त्याच्या वडिलांना घेवुन गेले. डॉक्टरांनी तपासुन मरण पावल्याचे सांगीतले फिर्यादीचे मित्र मंडळी काटोल येथील सरकारी दवाखान्यात हजर होते त्यापैकी बालाजी महादेवराव वंजारी यांनी फिर्यादीला सांगीतले कि सकाळी ११/४५ वा. बाजारात फिर्यादीचा मित्र जात असता तेव्हा तुझे वडिल शंकरराव वाईन्देशकर व यश पांडे बार मध्ये काम करणारा **आरोपी नामे– महेश प्रभाकर अनासने वय ५२ वर्षे रा कोल्हापुरी गेट अमरावती ह. मु. घोडे प्लॉट काटोल** याने त्याच्या जवळचा चाकु काढुन तुझ्या वडिलाच्या पोटामध्ये भोसकले व पळुन गेला असे फिर्यादीला सांगीतले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३०२ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक आगासे मो. नं. ८४४६२८३९२५ हे करीत आहे.

## जबरी संभोग

पो.स्टे. रामटेक :– यातील पिडीत फिर्यादीला **आरोपी नामे– निखील ज्ञानेश्वर खडसे रा. विवेकांनद नगर कन्हान** याने जंगलात नेवुन जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला. फिर्यादीने त्याला नकार दिले असता आरोपीने आपण प्रेम करतो काही होत नाही असे म्हणुन जबरी संभोग केला तसेच संभोग करतानी पिडीत फिर्यादीला न कळता व्हिडीओ बनवुन व व्हिडीओ वायरल केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३७६ (२) भादवी सहकलम ४, ५ बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक यावले मॅडम पोस्टे रामटेक मो नं. ७५८८८८१०८१ या करीत आहे.

## घरफोडी

**पो.स्टे. जलालखेडा** :– अंतर्गत ०८ किमी अंतरावरील खापा घुडन येथे दिनांक १६/१२/२०२३ चे २३.०० वा. ते दिनांक १७/१२/२०२३ चे ०५.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुरेश शामराव बागडे, वय ४८ वर्ष, रा. जामगाव ता. नरखेड जि. नागपुर यांचे बंद असलेले डांबर प्लांट मधुन कोणीतरी अज्ञात चोरटयांनी रात्री दरम्यान शटरचे कुलुप तोडुन व स्टोअर रूमचे कुलुप तोडुन व खुल्या जागेवरील बंकर व मिक्सर वरील ईलेक्ट्रीक मोटर, काटेरी तार, बॅटरी, पाने, लोखंडी, ॲंगल व ईतर सामान असा एकुण १०५०००/–रू चा मुद्देमाल चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. जलालखेडा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९, ३८०, ४५७ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मनोज शेंडे मो. नं. ९६३७५७८७६३ हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. खापा** :– अंतर्गत १२ किमी अंतरावरील मौजा कोच्छी शिवार येथे दिनांक १६/१२/२०२३ चे १९.०० वा. ते दिनांक १७/१२/२०२३ चे ०७.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– श्रीकृष्ण नारायण गवानकर, वय ६० वर्ष रा. कोच्छी हे शेतीचे काम करतात व त्याचे शेतात जंगली जनावरापासुन पिकाचे सरंक्षण करणेसाठी त्यांनी श्री अग्रो कंपनीची झटका मशिन किंमती ५०००/– रू. व स्कायटेक कंपनीची बॅटरी किंमती २०००/–रू. ची घेतलेली होती ती मशिन व बॅटरी ते शेतातच ठेवत असे. फिर्यादी हे शेतात गेले असता त्यांना श्री अग्रो कंपनीची झटका मशिन किंमती ५०००/– रू व स्कायटेक कंपनीची बॅटरी किंमती २०००/– रूपये असा एकुण ७०००/– रूपयाचा मुद्देमाल दिसुन आला नाही मशिन व बॅटरी कोणीतरी अज्ञात ईसमाने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार नारायण बोरकर हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी :–** पो.स्टे. एमआयडीसी बोरी हद्यीत यातील फिर्यादी यांनी दि. १७/१२/२०२३ रोजी पोस्टेला येवुन तोंडी रिपोर्ट दिली की फिर्यादीची नातीन वय १७ वर्षे हि दि. १५/१२/२०२३ ला दुपारी १४/०० वा. दुपारी ०२/०० वा. कॉलेज मधुन घरी परत आली व काही वेळा थांबुन कपडे बदलवुन परत बाहेर जात होती. तेव्हा फिर्यादीने मुलीला हटकले कुठे चालली असे विचारले असता तिने फिर्यादीला बाहेरुन येतो असे सांगितले तेव्हा पासुन ती आज पर्यंत घरी आली नाही व मोबाईल नंबर बंद आहे तेव्हा पासुन फिर्यादीने नातीनच्या नातेवाईकाकडे व आजुबाजुला शोध केला मिळुन आली नाही तसेच घरासमोर राहणारा आकाश राजु बावणे हा सुद्धा दिसुन आला नाही.

मुलीचे वर्णन :– रंग– गोरा , चेहरा– गोल, उंची –०५ फुट, मराठी व हिंदी भाषा बोलते पांढऱ्या रंगाचा सलवार पिवळया रंगाचा चुडीदार पायजामा घालुन गेली फिर्यादीची नातीन वय १७ वर्ष हिला घरासमोर राहणारा आकाश राजु बावणे याने पळुन नेले असावे असा फिर्यादीला संशय आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार प्रशांत काळे ब. नं. ९६९ पोस्टे एमआयडीसी बोरी मो. क्र. ९८२२५४९६९५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**